नि. फौ. ख. क्र.९३/२०२० निशाणी क्र.१८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – संजय शालीग्राम वैतकर

वय – ५८ वर्षे व्यवसाय – शेती

पत्ता – रा. गोरेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. एच. ए. जुनारे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि.१४.०५.२०२० रोजी मला पोलीसांनी पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते अथवा नाही हे मला आठवत नाही. मला पोलीसांनी त्या दिवशी घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता गोरेगाव बु. येथे फिर्यादी याच्या गोठ्याजवळ बोलाविले होते, असे काही घडले नव्हते. मी फिर्यादी संजय वैतकर यास ओळखतो कारण तो माझा सख्खा भाऊ आहे. श्रीकृष्ण उर्फ रवी आगरकर यास मी ओळखतो. माझा भाऊ व रवि आगरकर याच्यामध्ये वाद झाला त्यावेळी मी घरी नव्हतो. रवि आगरकर याने माझा भाऊ राजेश यास स्टीलच्या ग्लासने मारहाण केली होती अथवा कसे हे मला माहित नाही. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, असे काही घडले नव्हते. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर अ.क्र.१ वर माझी सही असून त्यातील मजकूर काय लिहीला आहे हे मला माहित नाही. सदर सहीस **नि.क्र.१९** देण्यात येत आहे.

२. तसेच मला दि.१७.०५.२०२० रोजी मला पोलीसांनी जप्ती पंचनामा करण्याकरीता गोरेगाव बु. येथे बोलाविले होते असे काही घडले नव्हते. आता मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर अ.क्र.१ वर माझी सही असून त्यातील मजकूर काय लिहीला आहे हे मला माहित नाही. सदर सहीस **नि.क्र.२०** देण्यात येत आहे.

(साक्षीदार अभियोग पक्षास पुरक साक्ष देत नसल्याकारणाने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.)

३. आता मला जप्ती व घटनास्थळ पंचनामा मधील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविण्यात आला तो पोलीसांनी का लिहीला आहे याचे कारण मला सांगता येत नाही. तसेच आता मला माझ्या दि.१४.०५.२०२० रोजीच्या जबाबातील अधोरेखांकित

भाग अ वाचून दाखविण्यात आला तो मी पोलीसांना सांगितला नव्हता पोलीसांनी तसे का लिहीले आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांनी उलटतपास नाकारला.**

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– २१.०७.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.07.21 17:48:17 +0530

**(दयानंद एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. दयानंद एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २१/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २१/०७/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | २१/०७/२०२५ |